# स्वच्छ भारत मिशनची लघुपट स्पर्धा

स्वच्छ संकल्पसे स्वच्छ सिध्दी अंतर्गत भारताला स्वच्छ बनविण्यात माझे योगदान या विषयावर दोन ते तीन मिनिटाची लघुपट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा 18 वर्षाखालील व 18 वर्षावरील अशा दोन गटात घेतली जाणार आहे. महाराष्ट्रामध्ये मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत फिल्म तयार करता येईल. सदरील स्पर्धेत जिल्हास्तरावर प्रथम येणाऱ्यास 15 हजार रुपये, द्वितीय 10 हजार रुपये तर तृतीय येणाऱ्यास 5 हजार रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. तर राज्यस्तरावर दोन्ही गटातून प्रथम 51 हजार रुपये, द्वितीय 31 हजार रुपये, तृतीय पुरस्कार 11 हजार रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र स्पर्धकांना देण्यात येणार आहे. फिल्म मुल्याकंनात कल्पक आणि सुस्पष्ट विचार, साधी सरळ मांडणी, नवविचार विषयाला पोहचविण्यासाठी असणारी परिणामकारक मांडणी असावी. लघुपटाचे चित्रीकरण करण्यासाठी वापरलेले तंत्रज्ञान त्या लघुपटाला पुर्नप्रेक्षपीत करण्यासाठी सुयोग्य आणि त्या दर्जाचे असावे. जिल्हास्तरावरील विजेत्यांची प्रोफाईल आणि संपर्क तपशिल अचुकरित्या mygov.in येथे नोंदवायची आहे. हे प्रोफाईल दिलेल्या विहीत पध्दतीनुसार न भरणाऱ्या स्पर्धकांना स्पर्धेतून बाद करण्यात येईल. लघुपटाची निर्मिती स्पर्धकाची स्वत:ची असावी. लघुपटाची पटकथा ही कॉपीराईट कायद्याचा भंग करणारी नसावी. कॉपीराईटचा भंग करणाऱ्या स्पर्धकांना स्पर्धेतून बाद केल्या जाईल. तसेच पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्रालय भारत सरकार स्पर्धेतील सादरीकरणा संदर्भात कॉपीराईट आणि बौध्दीक संपदा कायद्याचा कुठल्याही उल्लंघनासाठी जबाबदार असणार नाही. लघुपटातील फुटेज, म्युझिक, इमेजेस, इत्यादी गोष्टी स्पर्धकांच्या स्वत:च्या असाव्यात. लघुपटातील मजकुर असभ्य, भितीदायक, मानहाणीकारक, बदनामीकारक, लिंग भेदावर आधारीत अश्लील आणि सार्वजनिक उपयोगाकरीता अनुपयुक्त असा नसावा. लघुपटातील मजकूर राष्ट्रीय, राज्यस्तरीय आणि स्थानिक कायद्याचा भंग करणारा नसावा. तसेच राष्ट्राची मानहाणी होईल असा नसावा. या स्पर्धेत केंद्र सरकार, राज्यसरकार आणि जिल्हा परिषदामधील पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाशी संबधीत अधिकारी, कर्मचारी व सल्लागार हे स्पर्धेत भाग घेऊ शकणार नाहीत. लघुपट येत्या 8 सप्टेंबर 2017 पर्यंत जिल्हा परिषद चंद्रपूर च्या जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षात अथवा nbazpchandrapur@gmail.com या इमेलवर पाठवावे.या स्पर्धेच्या अधिक माहि्ती करिता स्वच्छ भारत मिशनचे माहिती शिक्षण संवाद सल्लागार कृष्णकांत खानझोडे यांचा भ्रमणध्वणी क्रंमाक 7588890728 यावर संपर्क करावा. जिल्ह्यातील स्पर्धकांनी यास्पर्धेत मोठ्या संख्ये सहभागी व्हावे असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी जितेंद्र पापळकर यांनी केले आहे.

# जिल्हा परिषद, चंद्रपूर
## स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)

संकल्प स्वच्छतेचा... स्वच्छ महाराष्ट्राचा...
९ ऑगस्ट ते २ ऑक्टोबर २०१७

पेयजल व स्वच्छता मंत्रालय, भारत सरकार
पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन
स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण

स्वच्छ संकल्पसे स्वच्छ सिद्धी

स्वच्छ संकल्प से स्वच्छ सिद्धि

# लघुपट स्पर्धा (Short Film)



**निबंध स्पर्धेसाठी गट :**

१) १८ वर्षाखालील,
२) १८ वर्षावरील, (स्पर्धकांपैकी ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग गटात असणाऱ्या स्पर्धकांचा राष्ट्रीय स्तरावर सन्मानासाठी विशेष विचार केला जाईल.)

विषय : **भारताला स्वच्छ बनविण्यात माझे योगदान**

- फिल्मसाठी वेळ मर्यादा : २ ते ३ मिनिट
- फिल्मसाठी भाषा: महाराष्ट्रामध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेत फिल्म तयार करता येईल.
- सादरीकरण पद्धती : स्पर्धेसाठी तयार केलेला लघुपट जिल्हा कक्षाने उपलब्ध करून दिलेल्या ईमेलवर अथवा सिडीच्या माध्यमातून प्रत्यक्ष सादर करणे

## पारितोषिके

**१. जिल्हास्तर दोही गटातून प्रथम -**

प्रथम : रूपये १५ हजार, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र
द्वितीय : रूपये १० हजार, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र
तृतीय : रूपये ५ हजार, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र

**राज्यस्तर दोन्ही गटातून प्रथम -**

प्रथम : रूपये ५१ हजार, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र
द्वितीय : रूपये ३१ हजार, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र
तृतीय : रूपये ११ हजार, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र

**राष्ट्रीयस्तर स्पर्धेत विशेष पुरस्कार व मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गौरव.**

लघुपट स्पर्धा (Short Film) सादर करण्यासाठी अंतिम दिनांक : दि. ८ सप्टेंबर, २०१७ पर्यंत

लघुपट स्पर्धा (Short Film) सादर करण्याचे ठिकाण : जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद, चंद्रपूर

अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक : ७५८८८९०७२८
ई–मेल : nbazpchandrapur@gmail.com